# मनपा निवडणूक भाजपाकडे इच्छुकांची सर्वाधिक गर्दी सोमवारी मुलाखती

अकोला :अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात भारतीय जनता पक्षाकडे सर्वाधिक इच्छुकांनी नगरसेवक पदासाठी उमेदवारी मागितली असून त्यांची मुलाखत १५ डिसेंबर सोमवार रोजी आळशी संकुल स्थित भारतीय जनता पार्टी कार्यालय भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर ,खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल संघटन मंत्री डॉक्टर उपेंद्र कोटेकर जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर आमदार हरीश पिंपळे आमदार प्रकाश भारसाकळे महानगर अध्यक्ष जयंत ,मसणे, निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल, वैशालीताई शेळके पवन महल्ले, संघटन सरचिटणीस माधव मानकर सजयगोटफफोडे, रमेश अल्लकरी आम्रपाली उपरवट, एडवोकेट देवाशिष काकड, आधीच्या मार्गदर्शनात भारतीय जनता पार्टी कार्यालयात सकाळी दहा वाजता मुलाखती होणार आहे आणि भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग नुसार उमेदवारांची तीन उमेदवारांची पॅनल प्रदेश भाजपाकडे पाठवण्यात येणार आहे अंतिम निर्णय भाजपा प्रदेश निवड समिती करणार असून अकोला जिल्हा संचलन समिती यांनी केलेल्या शिफारशीनंतर व पक्षाच्या सर्व नुसार उमेदवारांची नावाची घोषणा करण्यात येणार आहे. भारतीय जनता पक्षाकडे ३५ अल्पसंख्यांक उमेदवारांनी उमेदवारी मागितली आहे तर ओबीसी वर्गातून २२७ तर ओपन मधून ३३२ तर महिलांनी ३०० जणांनी उमेदवारी मागितली आहे त्यांचे मत जाणून घेण्यात येणार आहे.

# हक्कभंग प्रकरणात पत्रकार पती-पत्नीसह एकाला शिक्षा

## ▪राज्यातील पहिलाच प्रकार ▪अकोला जिल्हा पत्रकार संघाकडून तीव्र निषेध

**प्रकरण काय आहे?... :**

- **महायुती सरकारमध्ये अजित पवार सामील झाल्यानंतर अकोल्यातील काँग्रेस कार्यकर्ते अंकुश गावंडे यांनी आमदार अमोल मिटकरी यांना डिवचले होते. यानंतर दोघांमध्ये मोबाईलवर शाब्दिक चकमक झाली होती. त्याच पार्श्वभूमीवर अंकुश गावंडे यांनी अमोल मिटकरी यांची मनोरुग्णालयात तपासणी करण्याबाबत नोंद केली होती.**
- **या नोंदीसंदर्भातील बातम्या अकोल्यातील काही पत्रकारांनी प्रसिद्ध केल्या होत्या. या बातम्यांमुळे आमदार अमोल मिटकरी यांची राज्यभर बदनामी झाल्याचा आरोप करण्यात आला.**
- **त्यामुळे आमदार मिटकरी यांनी आपला विशेषाधिकार वापरत संबंधित चार पत्रकारांविरोधात हक्कभंगाची कारवाई दाखल केली होती.या प्रकरणामुळे माध्यम स्वातंत्र्य, विशेषाधिकार हक्क आणि लोकशाहीतील पत्रकारांची भूमिका यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. येत्या काळात या निर्णयाविरोधात कायदेशीर व संघटनात्मक पातळीवर पावले उचलली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

राज्यात हक्कभंग प्रकरणात पत्रकारांवर थेट कारावासाची शिक्षा सुनावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी दाखल केलेल्या विशेषाधिकार हक्कभंग प्रकरणात विधान परिषद सभापतींनी अकोल्यातील इलेक्ट्रॉनिक मीडियाशी संबंधित तीन पत्रकार व एक काँग्रेस कार्यकर्ता यांना पाच दिवसांची कारावासाची शिक्षा सुनावली आहे.या प्रकरणात पत्रकार गणेश सोनवणे, हर्षदा सोनवणे (पती-पत्नी) अमोल नांदूरकर आणि अंकुश गावंडे (काँग्रेस कार्यकर्ता) यांना दोषी ठरवत सभापतींनी पाच दिवसांची शिक्षा जाहीर केली. विशेष म्हणजे पत्रकार पती-पत्नीला एकाच प्रकरणात शिक्षा होण्याचा हा राज्यातील पहिलाच प्रकार मानला जात आहे.

दरम्यान, याच प्रकरणात 'सत्य लढा' या युट्यूब चॅनेलचे संपादक सतीश देशमुख यांनी सभापतींकडे लेखी माफी मागितली. माफी स्वीकारत सभापतींनी देशमुख यांना या कारवाईतून वगळत माफी दिली आहे.या संपूर्ण घटनेमुळे राज्यातील पत्रकार वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, अकोला जिल्हा पत्रकार संघाने या कारवाईचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. पत्रकार संघाच्या मते, ही कारवाई अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारी असून, पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणारी आहे.पत्रकार संघाने स्पष्ट भूमिका घेत म्हटले आहे की, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर अशा प्रकारे कठोर कारवाई होणे चिंताजनक आहे. मतभेद असतील तर संवादाच्या मार्गाने तोडगा काढणे अपेक्षित आहे. कारावासासारखी शिक्षा देणे हे माध्यम स्वातंत्र्यावर आघात करणारे आहे.




**ज्या शिक्षकांच्या दर्शनी भागात लागलेल्या फालकावर लक्ष नाही ते विद्यार्थ्यांना कसे प्रकारे शिकवत असतील याचीच जणू माहिती हे फलक देत असावं .**

# विद्यार्थिनीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या शाळेवर कार्यवाही करण्याची परीट धोबी सेवा मंडळाची मागणी



**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

स्थानीय सेन्ट एन्स इंग्लिश मिडियम स्कुल मध्ये शिकणाऱ्या १३ वर्षिय अल्पवयीन विद्यार्थीनीचा मानसिक छळ व आत्महत्या केल्याच्या संदर्भात पालकांनी शाळेकडे वारंवार तक्रार करून सुध्दा शाळेने कोणतीही कार्यवाही केली नाही.सबब या दोषी शाळेवर त्वरित कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाने केली पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना मंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या निवेदनात विद्यार्थीनीच्या आत्महत्या प्रकरणात प्रस्तुत शाळा ही दोषी असून शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत निष्काळजीपणा केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच सदर प्रकरणात संबंधित आरोपी विद्यार्थ्यांवर आणि त्याच्या वडिलांवर गुन्हा नोंदवुन कारवाई सुरू झाली असली तरी, या दुर्देवी मृत्युस सर्वाधीक जबाबदार असलेल्यावर अद्याप कोणतीही कार्यवाई करण्यात आलेली नाही, ही खेदजनक बाब असल्याचे महाराष्ट्र राज्य परिट धोबी परिषद सेवा मंडळ, जिल्हा शाखा अकोलाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हणण्यात आले असून विद्यार्थ्यांना असुरक्षित वातावरण निर्माण करणारे शाळेतील 'फ्रि कल्चर' त्वरीत तपासण्यात यावे व दोषी शिक्षक, कर्मचारी आणि व्यवस्थापना विरुध्द कायद्याच्या अधिन राहुन आवश्यक ती सर्व पाउले उचलण्यात येऊन पिडीत कुटूंबाला न्याय मिळवुन देण्यासाठी प्रशासनाने प्रभावी आणि ठोस कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी व शिक्षणाधि कारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात

### मोफत वैद्यकीय शिबिरात ४०० नागरिकांची तपासणी

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे मोफत वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर सुभाष रोडवरील केएमटी हॉलमध्ये पार पडले. शिबिरात फिजिशियन, सर्जन, हृदयरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ आणि स्त्रीरोग तज्ञांनी विविध आरोग्य तपासण्या केल्या. तसेच हीमोग्लोबिन, ब्लड शुगर, सीबीसीसह अनेक रक्त तपासण्या मोफत करण्यात आल्या. गरजूंना आवश्यक औषधेही मोफत उपलब्ध करून दिली गेली. या वैद्यकीय शिबीराचे समन्वय डॉ. श्रेया अग्रवाल यांनी केले. सरकारी रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या टीमने सहकार्य केले. कार्यक्रमात राकाँचे प्रदेश उपाध्यक्ष व वरिष्ठ नेते श्याम अवस्थी, सचिव जावेद जाकारीया, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, महानगर कार्याध्यक्ष सय्यद यूसुफ अली, देवेंद्र ताले, पश्चिमचे अध्यक्ष महमूद खान पठाण, मोहम्मद शफीक, अमन घरडे आदी होते.

### नायलॉन मांजा बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अकोला :** जिल्हयात प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणारांविरुध्द कठोर कारवाई करणेबाबत मा श्री. अर्चित चांडक, पोलीस अधिक्षक अकोला यांचे निर्देश प्राप्त असून आज दिनांक ११/१२/२०२५ रोजी श्री. सुदर्शन पाटील, उपविभागिय पोलीस अधिकारी शहर विभाग यांचे मार्गदर्शना खाली त्यांचे पथकाने प्राप्त खात्रीलायक माहितीच्या आधारावर पोलीस स्टेशन सिटी कोतवाली हद्दीतील नागपूरी जिन परिसरात असलेल्या जनसेवा ट्रान्सपोर्ट येथ रेड कारवाई करुन एकुण ५,३९,०००/- रुपये किंमतीच्या ५३९ प्रतिबंधीत चायनिज नायलॉन मांजाच्या रिल्स जप्त केल्या. यामध्ये आरोपी ०१) मोहम्मद राजीक मोहम्मद इसाक रा. भारत नगर, अकोट फाईल, अकोला यास अटक करण्यात आली असुन आरोपी ०२) शेख अन्सार रा. नायगांव, अकोट फाईल अकोला याचा शोध घेणे सुरु आहे. दोन्ही आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे कलम ११०, २२३, ३(५) इ.छ.ड. सहकलम ४, ५, १५ पर्यावरण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक, अपर पोलीस अधिक्षक मा. बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागिय पोलीस अधिकारी मा. सुदर्शन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. रत्नदिप पळसपगार, पो.हे.काँ. अनिल खडेकार, विनय जाधव, रवि घिवे, संदीप गुंजाळ, पो.काँ. शेख नदिम, प्रफुल्ल बांगर यांनी पार पाडली.चायनिज मांजा शहरामध्ये पतंग उडविण्याकरीता वापरल्यामूळे दुचाकी चालक, पादचारी तसेच पशु पक्षी इत्यांदींचा जिव जाण्या इतपत गंभिर दुखापती होत असल्याचे दिसून येत आहे.

# तरुणांनी क्रोधावर नियंत्रण ठेवावे: विजयकुमार गडलिंगे

## जिल्हा कारागृहात मानवाधिकार दिन कार्यक्रमात प्रतिपादन



**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

तरुण मुले आपल्या रागावर नियंत्रण ठेवत नसल्याने अनावधानाने हातून गुन्हा घडतो व कारागृहाचि वाट धरावी लागते यासाठी क्रोधावर नियंत्रण ठेवून गुन्हेगारी वृत्ती त्यागावि असे प्रतिपादन सामाजिक न्याय संरक्षण संघाचे अध्यक्ष विजयकुमार गडलिंगे यांनी केले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये प्रकाश अंधारे ( से.नि. उपशिक्षणाधिकारी), हेमंत मोहता वकील (अध्यक्ष बार असोसिएशन, अकोला), श्री. दत्तात्रय गावडे (जिल्हा कारागृह अधीक्षक), कैलास काळे, (सीनियर जेलर), विठ्ठल पवार (जेलर), डॉ मावळे सर, डॉ.सुर्वे सर सुभेदार , सुनील बकाल , सागर फाटे कॉन्स्टेबल , उदय हातोलकर, कॉ. बरमगीर गिरी कॉ. निशांत गायकवाड, कॉ.राजू देशमुख, श्याम धरमठोक, निखिल सुकेडे, यांच्या उपस्थितीत मानवी हक्काचा वैश्विक जाहीरनामा १९४८ ह्यांचे कारागृह कर्मचारी व बंदीवान यांना मोफत वाटप करण्यातआले. जिल्हा कारागृहात गेल्या चार वर्षांपासून आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित केल्या जातो. ह्यासाठी कारागृह प्रशासनाने भरपूर मेहनत घेऊन हा सोहळा योग्य रीतीने संवैधानिक पद्धतीने अगदी शांततेत पार पाडला. यावेळी मान्यवरांकडून बंदिवानांना मानवाधिकारा प्रति जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले व त्यांचे समुपदेशन करण्यात आले. असे पंजाबराव वर यांनी कळिवले आहे.

# रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेव भजनसंध्याचे आयोजन

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

लाखो भक्तांचे तारणहार रामसापीर रामदेवबाबा यांच्या भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.पौष सुदी दुजच्या पावन पर्वावर श्रीराम देवबाबा श्रीश्यामबाबा सेवा समितीच्या वतीने स्थानीय गीता नगर परिसरातील श्रीरामदेवबाबा -श्रीश्यामबाबा मंदिरात सोमवार दि २२ डिसेंबर रोजी साय ७ वाजता रामदेवबाबा यांच्या भव्य भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.या भजन संध्येत भजन गायिका डॉ सौ मोनिका साबू,प्रेरणा चांडक,सौ सविता गांधी व सौ सोनल चितलांगे या आपल्या संगीतमय वाणीतुन रामसापीर बाबा रामदेव यांची भजने सादर करणार आहेत.या भजन उत्सवात भक्तांसाठी बाबाची दिव्य ज्योत साकार करण्यात येऊन यात सामूहिक आरती,दिव्य रोषणाई,मंदिर सजावट करण्यात येणार आहे.या भजन संध्येचा सर्व महिला,पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री रामदेवबाबा श्रीश्यामबाबा सेवा समितीच्या समस्त पदाधिकारी व ट्रस्टी वर्गाने केले.

# बाजार समितीत धान्याची आवक वाढली

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोला ( लोकनेते वसंतराव धोत्रे मार्केट यार्ड) येथे दि. ११ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजीच्या धान्याच्या आवक - विक्रीचे बाजार भाव जाहीर करण्यात आले. दुपारी २ वाजेपर्यंतच्या व्यवहारानुसार गहू २१०० ते २५८०, ज्वारी २००० ते २३५५, चणा ४८०० ते ५१४०, तर तूर ६२०० ते ७१०५ रुपये दराने विक्री झाली. सोयाबीनचा दर ३७०० ते ४३९५, मूग ५००० ते ६३५५, उडीद ४५०० ते ५००५, धनिया ६५०५, तिळ ७५०० ते १०७२५, तर मका १३५० ते १६०० रुपये इतका होता. सोयाबीन (सिड्स) दर ४६७० रुपये इतका स्थिर राहिला.

# अकोला येथे ५३ वी आंतरविभागीय नाट्यस्पर्धा उत्साहात आयोजित होणार

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अकोला विभागाच्या कामगार कल्याण समिती तर्फे आयोजित ५३ वी आंतरविभागीय नाट्यस्पर्धा २०२५-२६ दिनांक १५ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार, १५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रमिलाताई ओक हॉल, नवीन बस स्थानकासमोर, अकोला येथे पार पडणार आहे..

उद्घाटक म्हणून मा. डॉ. गजानन नारे (संस्थापक संचालक, प्रभात किड्स स्कूल, अकोला) उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. रोहन पलंगे (प्रादेशिक व्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र.५, रा.प. अमरावती प्रदेश) असतील. प्रमुख पाहुण्यांमध्ये मा. श्री. राजेश कोनवडेकर (मुख्य कामगार अधिकारी) आणि मा. सौ. वैशालीताई नवघरे (एमएसआरटीसी मध्यवर्ती कार्यालय, मुंबई; प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, अकोला) यांची उपस्थिती लाभणार आहे. विनीत म्हणून श्री. विलास राठोड (विभाग नियंत्रक, रा.प. अकोला विभाग) कार्यभार सांभाळतील.

प्रयोगांची वेळ: दररोज सायंकाळी ७.०० वाजता प्रमिलाताई ओक हॉल, नवीन बस स्थानकासमोर, अकोला प्राथमिक फेरीचे नाट्यप्रयोग वेळापत्रक १५/१२/२०२५ - 'एक कप चहा साठी' लेखक: प्रल्हाद जाधव दिग्दर्शक: अभिजीत कोल्हापुरे विभाग: कोल्हापूर १६/१२/२०२५ - 'सलवा जुडूम' लेखक: इरफान मुजावर
दिग्दर्शक: विजय मोरे विभाग: सातारा १७/१२/२०२५ - 'नटसम्राट' लेखक: वि.वा. शिरवाडकर दिग्दर्शक: रमेश सोनवणे विभाग: छत्रपती संभाजीनगर १८/१२/२०२५ - 'मी इतिहास गाडला नाही' लेखक: सुहास भोळे दिग्दर्शक: अशोक बनसोडे विभाग: सोलापूरअकोल्यातील नाट्यरसिकांसाठी ही स्पर्धा सांस्कृतिक आनंदाची पर्वणी ठरणार असून १५ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या प्रयोगांना मोठ्या उत्साहाची अपेक्षा आहे.

# १२ व्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा. विजयाताई मारोतकर

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनाच्या वतीने अकोला येथे पार पडणाऱ्या १२ व्या विचार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाची माळ प्रसिद्ध साहित्यिक प्रा. विजयाताई मारोतकर यांच्या गळ्यात पडली आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समग्र साहित्याचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात व्हावा या उद्देशाने गेल्या अकरा वर्षांपासून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन समिती अकोलाच्या वतीने राज्यस्तरीय विचार साहित्य संमेलन पार पडत आहे.

यावर्षी दि. २५ व २६ जानेवारी २०२६ रोजी पार पडणाऱ्या विचार साहित्य संमेलनाला एक तप पूर्ण होत आहे. संमेलनाच्या मार्गदर्शन व आयोजन समितीने १२ व्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा. विजयाताई मारोतकर



यांची निवड एकमताने केली आहे, प्रा. विजयाताई मारोतकर मुळच्या नागपूर येथील असून त्यांना बालवयातच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या सामूहिक प्रार्थना व भजनाचे बाळकडू मिळाले आहे, त्यांच्या आई, वडिलांचा आदर्श विवाह सुद्धा वंदनीय महाराज यांनीच लावून दिला होता, त्यामुळे श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या विचारांचा वारसा प्रा विजयाताई यांना आहे. साहित्य क्षेत्रातील एकूण २१ पुरस्कार प्राप्त,तसेच विविध साहित्य संमेलन अध्यक्ष, उदघाटक, निमंत्रक पद त्यांनी भूषविले आहेत.

माय मराठी नक्षत्र प्रतिष्ठान नागपूर संस्थेच्या माध्यमातून गेली अनेक साहित्य संमेलन व तसेच ' पोरी जरा जपून ', या काव्यमय कार्यक्रमाचे संपूर्ण महाराष्ट्रभर सादरीकरण करत आहेत. त्यांची एकूण ४५ प्रकाशित पुस्तके, ८ कथासंग्रह, १० काव्य संग्रह, ३चारोळी संग्रह, ५ लेख संग्रह, समीक्षा, आणि १४ चरित्रलेख इत्यादी प्रचंड साहित्य संपदा प्रकाशित आहे. वाचनातून व लेखनातून प्रसिद्ध व्यतिमत्व म्हणजेच प्रा. विजयाताई मारोतकर होत. अशा समृद्ध वारसा लाभलेल्या अध्यक्ष या १२ व्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाला लाभल्याने संमेलनाची उंची निश्चितच वाढली असल्याचा विश्वास संमेलन समितीने व्यक्त केला आहे.

# आरोग्यमंत्र्यांना एका प्राथमिक आरोग्य केंद्रावर दोन स्वास्थ अभ्यंगता नेमणूक करण्याची संघटनेची मागणी

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

एका प्राथमिक आरोग्य केंद्रावर दोन स्वास्थ अभ्यंगत त्याची नेमणूक करा. व आरोग्य कर्मचाऱ्यांना डाटा एन्ट्री पासून वगळा याबाबत निवेदन महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री मा. ना. प्रकाश आंबीटकर यांना नागपूर येथे उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर संचालक राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था नागपूर येथे महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना ३८८१ यांच्या वतीने संगीता जाधव यांनी जिल्हाध्यक्ष यांना निवेदन सादर केले.

प्राथमिक आरोग्य केंद्र तथा आरोग्य अधिकारी कार्यालयात आरोग्य सहायिका स्वास्थ अभ्यंगता स्त्री पद निर्माण करणे बाबत संदर्भनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २००१ शासन निर्णयानुसार पदाची जबाबदारी व कर्तव्य अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्रात



उपकेंद्रनिहाय दोन आरोग्य सहायिका यांची पद आवश्यक आहे सन २००७ पूर्वी एक पद २२१० या शीर्षिका अंतर्गत मंजूर होते तर दुसरे पद २२ ११ च्या शीर्षकांतर्गत मंजूर होते सन २००७ ला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पदाचा नवीन आकृतीबंध मंजूर झाला त्यामध्ये पूर्वीचे एक पद मंजूर होते ते कायम ठेवण्यात आले २२११ च्या पदाचा अद्यापही आढावा झाला नाही २२१० चे मधील पदे गोठण्यात आली नाही.

# हभप पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे १६ डिसेंबरला जाहीर हरिकीर्तन

**▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :**

स्थानिक सेठ बन्सीधर विद्यालय तेल्हारा २०२५ हे वर्ष शताब्दी महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे त्या अनुषंगाने हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणेकर यांचे हरी कीर्तनाचा कार्यक्रम १६ डिसेंबर मंगळवार ला आयोजित केला आहे.

कीर्तनाचे प्रयोजन विद्यार्थ्यांना आपली संस्कृती ज्ञान व्हावे व संस्कार रुजवावेत. शिस्त लागावी चरित्रवान विद्यार्थी निर्माण व्हावेत. शताब्दी महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष गोपालदास मल्ल, संस्थेचे उपाध्यक्ष बेनिप्रसादजी झुनझुनवाला, व्यवस्थापक राजेंद्र शाह, कोषाध्यक्ष अभिजीत शाह, संचालक तथा स्वामी विवेकानंद ज्ञानपीठाचे अध्यक्ष विठ्ठलराव खारोडे, संचालक तथा प्राथमिक विभागाचे अध्यक्ष डॉ. विक्रम जोशी, संचालिका अश्विनीताई खरोडे, संचालक विष्णू मल्ल , पुष्कर तांगडे, शिवम



पाडिया, ओमप्रकाश झुनझुनवाला, प्राचार्य गोपाल बापट, ज्ञानपीठाच्या प्राचार्या रंजना भागवत, प्राथमिकचे मुख्याध्यापक आशिष अग्रवाल यांनी पंचक्रोशीतील नागरिक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आव्हान केले आहे.

## बिडिओ जयश्री वाघमारे यांची बदली !

**अकोला** : अकोला पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांच्या बदलीचे आदेश दि. १२ डिसेंबर रोजी धडकले आहेत. त्यांची बदली नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे झाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. गटविकास अधिकाऱ्यांचा प्रभार आता कुणाकडे देणार याचे लक्ष लागून आहे. कारण सहा. बिडिओ प्रेमा पटोकार हया सुध्दा रजेवर असल्याची माहिती आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात आंतर महाविद्यालयीन अविष्कार संपन्न




**▪अकोला,दि १६(प्रतिनिधी) :**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात आंतर महाविद्यालयीन अविष्कार स्पर्धाचे भव्य आयोजन पदवीउत्तर शिक्षण संस्था, अकोला येथे दि. ११ डिसेंबर, २०२५ रोजी विद्यापीठाच्या समिती सभागृहात संपन्न झाले. सदर स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे संचालक तथा अधिष्ठाता कृषि डॉ. डी.एम. पंचभाई यांच्या शुभहस्ते द्वीपप्रज्वलन तसेच फित कापून केले. सदर स्पर्धेमध्ये विद्यापीठातील एकूण १६ महाविद्यालयीतील विविध पदवी अभ्यासक्रमातील जसे स्नातकोत्तर महाविद्यालयाचे ६१, पदविउत्तर महाविद्यालयीतील १४ तर आचार्य पदवी गटातून ०४ असे एकंदरीत ७९ नवकल्पना प्रकल्पासोबत नावीन्यपूर्ण संकल्पनाचे पोस्टर, भित्तिपत्रक, सचित्र मॉडेल, फोटोसह प्रदर्शन, द्वारे उत्कृष्ट सादरीकरण केलेत. सदर स्पर्धेचे मूळ संकल्पना ही राज्याचे महामाहीम राज्यपाल यांच्या कार्यालयामार्फत जानेवारीत दरवर्षी आंतरविद्यापीठ स्पर्धाचे आयोजन मुख्यतः तरुण वयातील युवक-युवती जे इतर क्रीडा प्रकारात सहभाग घेणे शक्य होत नाही अशाकरिता कला अविष्कार ही संशोधन आधारित स्पर्धा आयोजित केली जाते. तरुण युवकातील कल्पक बुद्धीतून नवनवीन संशोधन ही समाज, शेती उपयोगी व मानव कल्याणाकरिता उपयुक्त ठरतात. सदर आंतर महाविद्यालयीन अविष्कार स्पर्धेतून विद्यापीठ स्तरावर विद्यापीठाची संघ/ चमू निवड केली जाते व ही निवड केलेली चमू / संघ हे येणाऱ्या राज्यस्तरावरील आंतरविद्यापीठ स्पर्धत पाठविली जाते. डॉ. डी. एम. पंचभाई यांनी आपल्या भाषणात विद्यापीठातून येणाऱ्या काळात नक्कीच नवीन संशोधन अविष्कार संकल्पना बाहेर येतील असे संबोधानातून मत व्यक्त केले.

सदर स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या संशोधन वर्गवारीत व विविध पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यानी विद्यापीठात कोविड संकटानंतर प्रथमतः हीरहीरीने उसपूर्तीने मोठ्या संखेने सहभाग नोंदविला.

व आधुनिक काळाची गरज समजून कला अविष्कार संशोधनाचे उत्कृष्टरित्या सादरीकरण केलेत. या वेळेच्या स्पर्धत विद्यार्थ्यानी आपले कौशल्य पूर्ण संकल्पना निवड समिती समोर सादर केल्यात. त्यामध्ये ग्रामीण शेती व शेतकरीभिमुख, शाश्वत शेती पद्धती, कमी खर्चाची किफायतशीर व नैसर्गिक शेती पद्धती आधारित जीवनक्रम व संशोधन सिफरशी मांडल्या. तसेच नवीन तंत्रज्ञान कृतिम बुद्धिमत्ता, यंत्र शिक्षण ारलहळपश श्रशरीपळपस आधारित मोबाइल ॲपसब, मानव व वन्यजीव संघर्ष्य, टाकाऊ कचऱ्यातून उपयोगी टिकाऊ वस्तु अल्प-

# शाश्वत सह आर्थिक संपन्न ग्रामीण भारताचे स्वप्नपूर्ती साठी एकत्रित प्रयत्न करू: डॉ. सुरेंद्र काळबांडे

**▪अकोला,दि १६(प्रतिनिधी) :**
आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत आपल्या कृषि प्रधान देशातील कष्टकरी शेतकरी आर्थिक, सामाजिक संपन्न होण्यासाठी शेती क्षेत्रात नावीन्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञानाचा व कृषिपूरक व्यवसायाचा प्रभावी वापर गरजेचा असून कृषि अभियांत्रिकी शाखेचे पदवीधर म्हणून यां समाजाचे आपले काही देणे लागते.

यां भावनेने आपण सर्व एकात्मिक प्रयत्नांची मोट बांधत सुजलाम सुफलाम देश निर्मितीत हातभार लावू यां असें भावनिक आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी केलेडॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत ३ ऑक्टोबर १९७० स्थापन झालेल्या कृषी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय,अकोला येथे आयोजित दोन दिवसीय आजी -माजी विद्यार्थ्यांचे भव्य



संमेलनाचे (अँल्यूम्नी मिट) समारोपीय सत्राचे प्रसंगी मनोगत व्यक्त करताना उपस्थित आजी-माजी विद्यार्थ्याना संबोधित करताना ते बोलत होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने शाश्वत शेती समृद्ध शेतकरी संकल्पना कृतीत आणण्यासाठी कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अनुभवी मार्गदर्शनात केलेली वाटचाल विषद करतांना डॉ. काळबांडे यांनी देशांतर्गत शेती व्यवसायाची सद्यस्थिती व भविष्यातील आव्हाने अतिशय पोटतिडकीने मांडत कृषिच्या उर्जीताव्यवस्थेसाठी सर्वांचा सहयोग कसा घेता येईल यावर भाष्य केले.समारोपीय सत्राचे अध्यक्षस्थानी अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे व प्रमुख अतिथी माजी विद्यार्थी युगंधर मांडवकर, फ्रीलान्स कंसल्टंट, सुनील सरदार, अवर सचिव (महिला व बालकल्याण मंत्रालय) व अनिल रामटेके, इंडियन रेव्हेन्यू सर्विस कमिशनर ऑफ कस्टम यांची उपस्थिती होती तरइतर उपस्थितांमध्ये सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. सुधीर वडतकर, विभाग प्रमुख डॉ. महेंद्र देशमुख, डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. राजेश पातोडे, डॉ. प्रमोद बकाने आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

# सस्ती महावितरण सबस्टेशनचा भोंगळ कारभार

## सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांचा आंदोलनाचा इशारा

**▪पातुर,दि १६(प्रतिनिधी) :**
पातुर तालुक्यातील सस्ती येथील विद्युत वितरण विभागाचे सबस्टेशन चा कारभार ढेपाळला असून शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे आणि समस्याकडे वारंवार दुर्लक्ष केल्याने येथील भोंगळ कारभार चव्हाट्यावर येत असल्याचे बोलले जात आहे येथे शेतकरी बांधवांच्या विविध प्रश्नांसंदर्भात पांगरताटी येथील शेतकरी किशोर शिवराम जाधव, गौतम रामलाल दुग्गड, प्रकाश नामदेव चोंडकर यांच्या शेतातील बंद असलेल्या डिपी बाबत निवेदन दिले.मागील अनेक ०६/०६/ २०२५ पासून सस्ती सबस्टेशन अंतर्गत येत असलेल्या पांगरताटी येथील शेतकरी किशोर शिवराम जाधव, गौतम राम लाल दुग्गड, प्रकाश नामदेव चोंडकर यांच्या तिन्ही डीप्या गौतम रामलाल दुग्गड यांच्या शेतात असून त्या पावसाळ्याच्या पाण्यात वाहून गेल्या



होत्या.तेंव्हापासून त्या डिप्या बंद आहेत. त्या सर्व लवकरात लवकर सुरू करून देण्यात याव्या. यासाठी शेतकरी सस्ती येथील महावितरण ऑफिस ला वारंवार भेटी, निवेदन देऊन आपली समस्या मांडत आहेत. परंतु शेतकरी बांधवांच्या अर्जाला सस्ती महावितरण सबस्टेशनचे सहाय्यक अभियंता केराची टोपली दाखवत आहेत.शेतकरी बांधव वारंवार ऑफिसच्या भेटी मारून कंटाळले आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांनी सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या नेतृत्वाखाली सस्ती सबस्टेशन समोर शेतकरी गळफास का घेतो याचे नाविन्य पूर्ण आंदोलन करण्याचा इशारा दिला. आम्ही शेतकरी आहोत.

**सावकाराकडून आम्ही कर्ज घेतले आहे ते कर्ज फेडल्याशिवाय आम्ही शांततेत आयुष्य जगू शकत नाहीत. त्यामुळे आम्हाला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.एकतर शासनाने आम्हाला गळफास घेण्याची परवानगी द्यावी नाहीतर आम्ही गळफास का शेतकरी घेतात हे नाटकाच्या माध्यमातून सस्ती सबस्टेशन समोर आंदोलनाच्या माध्यमातून सादर करतो.**
**- निलेश तुकाराम कापकर**

# गीता परिवार अकोला शाखेच्या वतीने गीता जयंती सप्ताह भव्यतेने संपन्न

**▪अकोला,दि १६(प्रतिनिधी) :**
अकोला गीता परिवाराच्या वतीने गीता जयंती उत्सव सप्ताहात विविध शाळांमध्ये जाऊन ड्रॉईंग स्पर्धा आणि गीता आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन यशस्वीपणे पार पडले. अमृत कलश शाळेत दीपप्रज्वलनाने सुरुवात होऊन गीता अध्याय १२ चे पठण करण्यात आले. यासोबतच १४१ साधकांनी ऑनलाइन गीता पाठ १ च्या बॅचचे गीता जिज्ञासू प्रमाणपत्रांसह सर्वांना बिस्किट्सचे वितरण करण्यात आले.या आयोजनात अकोला येथील ज्ञान दर्पण शाळा, मां रेणुका सेमी इंग्लिश शाळा, मां सरस्वती सेमी इंग्लिश शाळा, मां शारदा ज्ञानपीठ, मुंगीलाल बाजोरिया शाळा, गिगल्स प्ले शाळा, अमृत कलश शाळा आणि तुरुंगातील कर्मचाऱ्यांच्या मुलांचा सहभाग होता. प्रत्येक शाळेतील इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या ३५० मुलांनी भगवान कृष्णाच्या छायाचित्राला रंगवले, जे अत्यंत सुंदर झाले. संपूर्ण सप्ताह रंग भरा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले.दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी मुंगीलाल बाजोरिया शाळेत अकोला शाखेच्या वतीने गीता जयंती उत्सव स्व. विमल गोयनका यांच्या स्मृतीप्रित्यर्थ साजरा करण्यात आला. मंचावर मुख्य अतिथी म्हणून वरिष्ठ महिला प्रकोष्ठ अध्यक्षा सौ. प्रमिला रमण लाहोटी, मुंगीलाल बाजोरिया




शाळेचे सचिव अनिल शशिमोहन तापडिया, प्रमुख वक्ते गीतावृत्ती दिनेश पांडे, गीता परिवार अध्यक्षा कल्पना भुतडा, अभिभावक ज्योती बाहेती आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गीता पूजनाने झाली. अतिथींचे पुष्पाहाराने स्वागत करण्यात आले. प्रमिला लाहोटींचे परिचय शिल्पा चांडक यांनी आणि स्वागत ज्योती बाहेती यांनी केले. दिनेश पांडे यांचे परिचय मृणाल कुलकर्णी यांनी आणि स्वागत मंजू बियाणी यांनी केले. यावेळी दिनेश पांडे यांचा गीतावृत्ती होण्याबद्दल स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. नंतर गायत्री बालिकाश्रमाच्या मुलींनी गीता अध्याय १५ चे पठण केले.अध्यक्षीय उद्बोधनात गीता परिवाराच्या निःशुल्क ऑनलाइन वर्गांची माहिती कल्पना भुतडा यांनी दिली.

अभिभावक ज्योती बाहेती यांनी गीता परिवाराच्या स्थापनेला ४० वर्षे पूर्ण झाल्याबाबत देशभरातील कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली आणि नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. प्रमुख वक्ते दिनेश पांडे यांनी गीता सर्व १८ अध्यायांचे प्रत्येक अध्यायाचे महत्वाचे सार यावर मार्गदर्शन केले. मुख्य अतिथी प्रमिला लाहोटी यांनी आध्यात्मिक विषयावर मार्गदर्शन केले.सर्व विजेते मुली व मुलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## मानवाधिकार सुरक्षा परिषदचा बाल संवाद उपक्रम

**अकोला** : राष्ट्रीय व सामजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा परिषदच्या स्थानिय शाखेच्या वतीने बालकांना मिष्टान्न वितरित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा परिषदेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संदीप बी. शर्मा यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून पदाधिकारी वर्गाने स्थानीय मलकापूर परिसरातील गायत्री बालिका श्रमात उपस्थित होऊन तेथे बालकांशी संवाद साधून कार्यक्रम साजरा केला. यावेळी बालकांनी संस्कृत प्रार्थना करीत स्वागत करीत शुभेच्छा दिल्यात. यावेळी बालकांना मिष्टान्न वितरित करण्यात आले. कार्यक्रमात केक कापून व दीर्घायुष्याची कामना करीत आनंद व्यक्त करण्यात आला. बालकांनी यावेळी सामूहिक गुरु प्रार्थना करीत कार्यक्रमाची सांगता केली. संचालन महिला सेल अकोला अध्यक्ष कु रागिणी वानखडे यांनी तर आभार महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष ओमप्रकाश सुरवाडे यांनी मानलेत.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
----OLD NAME----
**KIRITKUMAR YESHWANTRAI MEHATA**
----NEW NAME----
**KIRIT YASHVANTRAY MEHTA**
My Residential Address is :- 402, Anand Residency Gorakshan Road Near Sai Mandir Datta Colony Akola Maharashtra 444001.

# अस्मिता मिश्रा यांचे सौंदय स्पर्धेत घवघवीत यश

**▪अकोला,दि १६(प्रतिनिधी) :**
स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहेत. दिव्यांगांना समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी संस्था विविध सौंदर्य स्पर्धेत दिव्यांगांना पाठवीत असून सदर स्पर्धेत दिव्यांग बांधव यश संपादन करीत आहेत. दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला ची सदस्य अस्मिता मिश्रा यांनी नागपूर येथे झालेल्या खिलते सितारे फाउंडेशनच्या सौंदर्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून अकोल्याचे नाव चमकवले आहे. विशेष म्हणजे ऑक्टोबर महिन्यात पुणे येथे झालेल्या कस्तुरी राईस फाउंडेशनच्या सौंदर्य स्पर्धेतही अस्मिता मिश्रा यांनी बाजी मारली आहे. ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे झालेल्या सदर स्पर्धेत संपूर्ण भारतातून दिव्यांग स्पर्धक उपस्थित होते. अस्मिता आपल्या यशाचे श्रेय दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विशाल कोरडे, आई अरुणा सोळंके, अजिंक्य फिटनेसचे धनंजय भगत, कुटुंबीय व प्रोत्साहन देणाऱ्या मैत्रिणींना देते. यापुढे दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या माध्यमाने आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत सहभाग नोंदवण्याचा मानस अस्मिता मिश्रा व्यक्त करते. ज्या दिव्यांग महिलांना विविध स्पर्धेत सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान डॉ. संजय तिडके यांनी केले आहे. या यश संपादनाबाबत दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या सौ. भारती शेंडे, डॉ. संतोष हुसे, अनुराधा साठे, नीता वायकोळे, विजया मानमोडे, सुरज कडू, अंजली तंटपाले, आसिफ शेख, तेहमिना मिर्झा,यांनी अस्मिता मिश्रा यांचे अभिनंदन केले आहे.दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या या सामाजिक उपक्रमाचे भारतातील विविध समाज माध्यमावर कौतुक केले जात आहे.



## धनादेश अनादरीत प्रकरणी २ लाख दंड

**अकोला** : उधारीत घेतलेल्या साहित्यापोटी व्यवसायीकाला दिलेला धनादेश अनादरीत झाल्याने न्यायप्रविष्ठ असलेल्या एका प्रकरणात दिपक महादेव इंगळे यास २ लाख रुपये दंड व आठ दिवसाच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली. दिपक इंगळे यांनी धिरज गौतम हिरोळे रा. खरप यांचेकडून काही साहित्य खरेदी केले होते. या खरेदीपोटी इंगळे यांनी हिरोळे यांना धनादेश दिला होता. तो वटणावळीसाठी बँकेत पाठविला असता खात्यात पुरेशी रक्कम नसल्याच्या कारणावरुन बँकेने परत पाठविला होता.

## थोडक्यात

### सीताबाई महाविद्यालयाच्या साक्षी व पूनम अर्थशास्त्रात गुणवत्ता यादीत

**अकोला** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठानी नुकतीच गुणवत्ता यादी जाहीर केली ज्यामध्ये दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील एम. ए. अर्थशास्त्राच्या दोन विद्यार्थिनींनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ च्या परीक्षेमध्ये यश संपादन केले. एम ए अर्थशास्त्र मध्ये कु. साक्षी संतोष वाकोडकर हिने ८.९८ सी जी पिये मिळवून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत तिसरे स्थान प्राप्त केले तर कु. पुनम भारत गावंडे हिने ८.९४ सी जी पिये मिळवुन विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत चौथे स्थान प्राप्त केले. दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंहजी मोहता व मानद सचिव डॉ. पवनजी माहेश्वरी यांच्या आशीर्वादाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर डी सिकची यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई यांच्या मार्गदर्शनात अभ्यासातील सातत्य व चिकाटीच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी हे नेत्र दीपक यश प्राप्त केले.त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपले आई-वडील, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई, प्रा. प्रतिभा येवले, प्रा. अमृता बेंद्रे. प्रा. किर्तिका चोरे, प्रा. समिक्षा तेलगोटे, प्रा. प्राची पाटील यांच्या सह सर्व सहकारी यांना दिले त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

### महानच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

**महान** : अकोला येथे प्रोऍक्टिव अबॅकस रीजनल लेवल कॉम्पिटिशन घेण्यात आली त्या कॉम्पिटिशनमध्ये महान येथील अनुश्री प्रोऍक्टिव अबॅकस सेंटर च्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. अकोला येथे झालेल्या रीजनल लेवल कॉम्पिटिशन मध्ये २६ सेंटरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता . यामध्ये अकोला वाशिम, बुलढाणा, नांदेड या जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी होते. अनुश्री प्रोऍक्टिव अबॅकस सेंटर महान चे एकूण २० विद्यार्थी रीजनल कॉम्पिटिशन ला बसले होते. त्यातील ८ विद्यार्थी नॅशनल ला सिलेक्ट झाले व १२ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्सचे मेडल मिळाले. व तसेच अनुश्री प्रोऍक्टिव अबॅकस सेंटर च्या संचालिका सरिता गणेश परांडे मॅडम यांना बेस्ट टीचर अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. नॅशनलला पात्र झालेली विद्यार्थी- राधिका काळे, राम गोरे, भक्ती गोरे, समृद्धी डोके, श्री हातोलकर पात्र झाले आहेत.

# मोकाट कुत्र्यांच्या नसबंदीच्या कामाला सुरुवात नागरिकांसाठी हेल्पलाइन क्रमांक जारी

**▪अकोला,दि १६(प्रतिनिधी) :**
शहरात मोकाट कुत्र्यांची वाढती संख्या पाहता, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा पाऊले उचलली आहेत. बीड येथील युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फ अर सोसायटी या संस्थेला मोकाट कुत्र्यांच्या नसबंदीचे कंत्राट देण्यात आले आहे.

मात्र, या संस्थेकडून कामाला सुरुवात झाली नसल्याने महापालिकेने वारंवार सूचना दिल्या. यानंतर अखेर हे काम सुरू होणार असल्याची माहिती विभाग प्रमुख अनिल बिडवे यांनी दिली आहे.महापालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची वाढती संख्या नियंत्रणात आणण्यासाठी यापूर्वीही प्रशासनाने प्रयत्न केले होते. युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीला यापूर्वी चार महिन्यांसाठी नसबंदीचे कंत्राट देण्यात आले होते, जे ३१ मार्च रोजी समाप्त झाले.

यानंतर महापालिकेने तीन वेळा नव्याने निविदा आमंत्रित करूनही, जुन्या बीड येथील संस्थेनेच यात रस दाखवल्याने नाईलाजाने महापालिका प्रशासनाने याच संस्थेला पुन्हा कंत्राट दिले आहे. यापूर्वी डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत संस्थेने शहरातील विविध भागांमध्ये एकूण २, ३९९ मोकाट कुत्र्यांची नसबंदी केल्याचा दावा केला होता. शस्त्रक्रिया आणि संबंधित कामांसाठी सरासरी १,३५६ रुपये प्रति श्वान इतका खर्च आला होता, ज्यासाठी संस्थेला एकूण ३२ लाख रुपये मानधन म्हणून देण्यात आले होते. नसबंदीच्या कामासाठी बीडच्या कंपनीव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेकडून निविदा प्राप्त न झाल्याने त्याच जुन्या कंपनीला पुन्हा काम देण्यात आले आहे. याबाबत आम्ही संस्थेशी संपर्क साधून तातडीने काम सुरू करण्यास सांगितले आहे.

# शाळांमधील विद्यार्थ्यांची पडताळणी

**अकोला** : संचालकांच्या आदेशानुसार राज्यात सर्व शासकीय आणि खासगी अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या हेड काऊंटची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी १६५ पथके स्थापन करण्यात आली आहेत. शाळेला भेट देऊन उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या तपासण्याचे काम या पथकांकडून केले जाणार आहे.राज्यस्तरावरून राज्यात लवकरच एकाचवेळी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती पडताळली जाणार आहे.

त्याआधी केंद्रप्रमुख स्तरावरून शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करण्याचे निर्देश शिक्षण संचालकांनी दिले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने जिल्ह्यात ही खातरजमा करण्यासाठी १६५ पथकांची स्थापना केली आहे. सध्या या पथकांकडून शाळांना भेटी देऊन तिथे उपस्थित विद्यार्थी, यू डायसवर नमूद विद्यार्थी संख्या, सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी याची माहिती तपासण्यात येत आहे. राज्यात सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षापासून संचमान्यता यू डायस प्लस प्रणालीमधील मुख्याध्यापकांनी नमूद माहितीच्या आधारे केली जाणार आहे. त्याकरिता यू डायस प्लस प्रणालीवर मुख्याध्यापक लॉगिन मधून विद्यार्थी माहिती भरण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थ्यांची माहिती संच मान्यतेकरिता विचारात घेतली जाणार आहे.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

